# स्टँडर्ड चार्टर्ड मॅरेथॉनमध्ये धावण्यासाठी कॉर्पोरेट्स सज्ज

## १५ जानेवारीला होणार मुंबईत स्पर्धा

**सकाळ न्यूज नेटवर्क**

**मुंबई** : स्टँडर्ड चार्टर्ड बँकेतर्फे दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या मुंबई मॅरेथॉन स्पर्धेला उद्योगजगताकडून नेहमीच मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळतो. यंदाची मॅरेथॉन स्पर्धा १५ जानेवारी रोजी होणार असून कॉर्पोरेट जगत यासाठी सज्ज झाले आहे.

बजाज इलेक्ट्रिकल्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर बजाज आणि कार्यकारी संचालक अनंत बजाज यांनी या स्पर्धेत धावण्याचे ठरवले आहे. शेखर बजाज यांनी हाती घेतलेल्या 'किक दि टोबॅको ड्रॅगन' या तंबाखुविरोधी मोहिमेचा प्रसार ते या स्पर्धेत करणार आहेत. त्याचप्रमाणे शेखर बजाज यांच्या पत्नी किरण बजाज प्रमुख असलेल्या 'पर्यावरण मित्र' या मोहिमेचाही प्रचार यात केला जाणार आहे. 'बजाज इलेक्ट्रिकल्स'चे एकूण १२० कर्मचारी या स्पर्धेत धावतील.

एडलविस कंपनीच्या प्रत्येकी ५ जणांच्या ८ टीम्स कंपनीचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रशेश शहा यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धेत उतरणार आहेत. एडलगिव्ह ही कंपनीची सीएसआर उपक्रम राबवणारी संस्था तसेच मुंबई मोबाईल क्रेचेस, मासूम यांसारख्या स्वयंसेवी संस्था यांच्या कार्याचा प्रसार कंपनीच्या टीम्स करतील.

याखेरीज यूकेच्या एक्सपरियन कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रिचर्ड फिडीस, नोमुरा कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक विकास शर्मा, अध्यक्ष आर. के. रंगन हेदेखील स्पर्धेत धावणार आहेत. आरपीजी समूहाचे अध्यक्ष अनंत गोएंका, कार्यकारी संचालक अर्णव बॅनर्जी यांच्यासह कंपनीचे अन्य कर्मचारीही मॅरेथॉनमध्ये उतरणार आहेत.